







## महाराष्ट्र शासन

## अर्थसंकल्पः २०१५-१६

# उद्योग, उर्जा व कामगार विभाग

**समर्थन**


**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

११५- समर्थन, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई स्थानकासमोर,
वसई (पू), ठाणे -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/१०४
Email: samarthanmumbai97@gmail.com website: www.samarthanadvocacy.org

# समर्थन

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखर प्रभू
उपाध्यक्ष : श्री. टी. के. चौधरी
कार्याध्यक्ष : श्री. विवेक पंडित

- संपादक -
मुक्ता भारती
-विश्लेषक-
गुरुनाथ सावंत (९९६७७२२९०७)

नोंदणी क्रमांक:
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
समर्थन – ११५-धुरी कॉमर्स प्लाझा,
वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), ठाणे – ४०१ २०८

दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

**लोकशाही बळकट करण्याकरिता**
**उपेक्षितांचे ‘समर्थन’**

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# उद्योग, ऊर्जा व कामगार विभागास
# निधी उपलब्ध करून देण्यास शासन उदासीन!

आलेख क्र. १. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारित अंदाज व प्रत्यक्ष खर्च




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ अर्थसंकल्पीय अंदाज | ३०३४ | ४३८४ | ३७८७ | ३९७४ | ५२३८ | ६४६९ | ८०३४ | १०३८३ | १४६१५ | ११३२५ |
| □ सुधारित अंदाज | ३९६८ | ५१७३ | ५५४९ | ७२२२ | ६८५० | १०२४१ | १०८३५ | ११५७५ | १५८५७ | |
| ▪ प्रत्यक्ष खर्च | ४१५९ | ५०१३ | ४७५८ | ७०१४ | ६८३८ | ९९४४ | १०२७० | १०५३४ | | |

*(स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज भाग- २, टीप:- वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २००६-०७ ते २०१३-१४ या कालावधीत विभागाला सरासरी निधी उपलब्ध होण्याचे प्रमाण हे रु. ७ हजार ३१६ कोटी इतके आहे.

- वर्ष २०१५-१६ ची अर्थसंकल्पीय तरतूद ही वर्ष २०१४-१५ च्या सुधारित अंदाजापेक्षाही कमी आहे यावरुन विभागाला त्यांच्या खर्चाचे योग्य नियोजन व अंदाज घेता आलेला नाही.

- विभागाने वर्ष २०१४-१५ मध्ये रु. १४ हजार ६१५ कोटींचे अर्थसंकल्पीय अंदाज केले असले व सुधारित अंदाज रु. १५ हजार ८५७ कोटीचे दिसत असले तरी नेहमीप्रमाणे विभागाला सुधारित अंदाजाइतका निधी प्राप्त होणार नाही हे वरील आलेखावरुन स्पष्ट होते.

- वर्ष २००७-०८ पासून राज्य शासनाने विभागाला कधीही सुधारित अंदाजाइतका निधी उपलब्ध करुन दिलेला नाही.

- वर्ष २००८-०९ पासूनचे विभागाचे अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा सुधारित अंदाज हे २ ते ३ हजार कोटींनी जास्त दिसतात. सातत्याने सुधारित अंदाजामध्ये इतक्या पटीने वाढ केली जाते मात्र त्या पटीने अर्थसंकल्पीय अंदाज कधीही न करणे हे एक **Bad Budgeting** चेच उदाहरण म्हणावे लागेल व यावर राज्य शासनाचा देखील अंकुश नसल्याचे दिसून येते.

# राज्यातील अर्थसंकल्पात
# उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा वाटा ४.६५ टक्के

आलेख क्र. २. राज्य अर्थसंकल्पातील उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे स्थान.




*(स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज भाग- २, टीप:- वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- राज्याच्या खर्चाच्या तुलनेत वर्ष २००६-०७ ते २०१३-१४ पर्यंत विभागाचा सरासरी प्रत्यक्ष खर्च ५.७२ टक्के इतका.

- वर्ष २००७-०८ मध्ये राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत विभागाचा प्रत्यक्ष खर्च ६.०८ टक्के होता तो पुढे कमी होऊन वर्ष २००८-०९ मध्ये ४.७२ टक्के झाला त्यानंतर सातत्याने त्यात चढ-उतारच दिसून येतो व वर्ष २०१५-१६ मध्ये सर्वात जास्त ४.६५ टक्के इतकी घट झाली आहे.

- राज्य अर्थसंकल्पातील या विभागाचा हिस्सा पाहता वर्ष २०१३-१४ मध्ये ५.६० टक्के इतका हिस्सा असतानाही वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज हे ६.८६ टक्के इतके व वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज केवळ ४.६५ इतकेच दिसून येतात यावरून विभागाचा नियोजन शून्य कारभार स्पष्ट होतो.

- राज्याचा औद्योगिक विकास व उर्जा यांवरील मागील दहा वर्षाचा खर्चाचा आलेख पाहता तो स्थिर दिसून येतो ६.६६ टक्क्यांच्या वर तो कधीच गेला नाही या स्थिरतेमुळे राज्याचा औद्योगिक विकास ढासळत असून राज्यातील उर्जास्त्रोत वाढण्यास मर्यादा येत आहेत व कामगारांच्या विकासाला देखील खिळ बसली आहे. आता नव्याने आलेल्या शासनाने तरी सदर औद्योगिक विकास, कामगारांचा विकास तसेच उर्जास्त्रोत वाढविणे याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे.

# मागील ८ वर्षात विभागाचा योजनेतर खर्च योजनांतर्गत खर्चापेक्षा सरासरी २४२ टक्क्यांनी अधिक!

आलेख क्र. ३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा योजनांतर्गत व योजनेतर खर्च.




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनांतर्गत खर्च | ११७० | ६९७ | १२९६ | १३७२ | १८३४ | १७७१ | २१८९ | २८८९ | १८०९ | २०२८ |
| योजनेतर खर्च | २९९० | ४३१६ | ३४६२ | ५६४३ | ५००४ | ८१७४ | ८०८९ | ७६४५ | १४०४८ | ९२९७ |

*स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज भाग- २, खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज.*
*टीप:- वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वरील आलेख उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे स्वरूप स्पष्ट करतो.
- वर्ष २००६-०७ ते २०१३-१४ या कालावधीत विभागाचा योजनांतर्गत सरासरी खर्च रु. १ हजार ६५२ कोटी इतका आहे.
- वर्ष २००६-०७ ते २०१३-१४ या वर्षात विभागाचा सरासरी योजनेतर खर्च रु. ५ हजार ६६५ कोटी इतका आहे.
- वर्ष २००६-०७ ते २०१३-१४ या कालावधीत विभागाचा सरासरी योजनांतर्गत खर्चापेक्षा सरासरी योजनेतर खर्च हा रु. ४ हजार १३ कोटींनी (२४२ टक्के) अधिक आहे.

# ऊर्जा विभाग

**ऊर्जा विभागावर राज्यपालाची नाराजी:-**
**ऊर्जा क्षेत्र : कृषि पंपसंचाना वीज पुरवठा करणे**

- ऊर्जा विभागाने कळविल्यानुसार ३१ मार्च २०१४ रोजीच्या कृषि पंप विद्युतीकरणाचा शिल्लक अनुशेष ३५,०४५ होता. विभागाने ठाणे, रायगड, रत्नागिरी, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये २०१४-१५ मध्ये १४००० कृषि पंप विद्युतीकरणाचे उद्दिष्ट ठेवले होते. २०१३-१४ मध्ये ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत भौतिक साध्य फक्त ५६६३ पंप एवढेच होते. **माननीय राज्यपाल यांनी अनुशेष निर्मूलनाच्या कमी वेगाबाबत असमाधान व्यक्त केले आहे.**
- दिनांक १३ मार्च २०१३ च्या निदेशामधील परिच्छेद २२ नुसार, राज्यपाल यांनी ऊर्जा विभागास सौर ऊर्जेचा वापर करून कृषि पंप विद्युतीकरणाबाबत व्यवहार्यता अभ्यास (Feasibility Study) हाती घेण्याबाबत निदेशित केले होते. ऊर्जा विभागाने जरी हा व्यवहार्यता अभ्यास केला असला तरी, विभागाने या अभ्यासाच्या शिफारशींची अंमलबजावणी केली नाही.
- माननीय राज्यपाल यांनी सौर ऊर्जेद्वारे कृषि पंप विद्युतीकरणाच्या गडचिरोली जिल्ह्यातील पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत झालेल्या दिरंगाई बद्दलही असमाधान व्यक्त केले आहे.
- विभागाने नुकतीच केंद्र पुरस्कृत कार्यक्रमाअंतर्गत राज्यात ७५४० सौर कृषिपंप उभारणीची योजना सादर केली आहे. माननीय राज्यपाल यांनी असे लक्षात घेतले आहे की, असे सौरपंप जिथे परंपरागत विद्युतजोडणी करणे अवघड जाते अशा भागात उभारणे योग्य राहील. राज्यपाल यांनी असे निदेशित केले आहे की, दुर्गम वस्त्या जिथे नेहमीचा विद्युतीकरणाचा कार्यक्रम घेणे शक्य नाही तेथे प्राधान्याने सौरपंप उभारणीचा कार्यक्रम घ्यावा. आणखी, जेथे आवश्यक व शक्य असेल तेथे सौरऊर्जेद्वारे घरे, अंगणवाडी, शाळा, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पिण्याच्या पाण्याची योजना आणि रस्त्यावरील दिवे यांच्या विद्युतीकरणाची योजनाही हाती घ्यावी, ज्यायोगे ग्रामस्थांच्या सर्व गरजा एकत्रितरित्या पूर्ण होतील.
- विभागाने ठाणे, रायगड, रत्नागिरी, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये २०१५-१६ मध्ये १२५०० कृषि पंप विद्युतीकरणाचे उद्दिष्ट प्रस्तावित केले आहे. त्यासाठी रु. २२० कोटींची मागणी प्रस्तावित केली आहे. राज्यपाल यांचे असे निदेश दिले आहेत की, एवढा नियतव्यय आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये या क्षेत्रासाठी ठेवण्यात यावा.

- स्त्रोत:- मा. राज्यपाल, यांचे दि. १० मार्च, २०१५ रोजीचे निदेश

**शासनाकडून दर्जाहीन सौरकंदीलाचे वाटप**

रत्नागिरी जिल्ह्यात जिल्हा वार्षिक योजना व जिल्हा परिषद 'सेस' योजनेअंतर्गत या वर्षी जिल्ह्यातील १ हजार ४७९ लाभार्थ्यांना देण्यात आलेले सौर कंदिल पेटत नसल्याची तक्रार लाभार्थ्यांनी केली आहे. सदर दर्जाहीन सौरकंदील ३ हजार रुपये किंमतीचे असून लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर पुरविण्यात येणार होते व यासाठी लाभार्थ्यांकडून दीड हजार व योजनेतून दीड हजार भरले गेले होते.

**प्रहार-२३ डिसेंबर २०१४**

# राज्य अजूनही विजेविना अंधारात!

तक्ता क्र. १ **महाराष्ट्र राज्य विद्युत निर्माण कंपनी कडील माहिती** (दशलक्ष युनिटमध्ये)

| वर्ष | विजेची आवश्यकता | उपलब्ध वीज | विजेचा तुटवडा | तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २००८-०९ | १०४५१९ | ८२६६६ | २१८५३ | २१ % |
| २००९-१० | १०७७८९ | ८८१०० | १९६८९ | १८ % |
| २०१०-११ | ११२००३ | ९३४०४ | १८५९९ | १७ % |
| २०११-१२ | १२४४८२ | १०२५५८ | २१९२४ | १८ % |
| २०१२-१३ | १०८४२४ | १०४५६९ | ३८५५ | ४ % |
| २०१३-१४ | १०९२५९ | १०६७१५ | २५४४ | २.३२ |
| २०१४-१५* | १०१०४४ | ९९४६२ | १५८२ | १.५६ |

* जानेवारी -२०१५ पर्यंत

स्त्रोत : माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त माहिती २५ फेब्रुवारी, २०१५

- वर्ष २०१३-१४ मध्ये जानेवारी २०१४ पर्यंत राज्याला १ लाख १ हजार ४४ दशलक्ष युनिट विजेची आवश्यकता होती मात्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. मार्फत ९९ हजार ४६२ दशलक्ष युनिट वीज उपलब्ध करुन देण्यात आली म्हणजेच १ हजार ५८२ दशलक्ष युनिट विजेचा तुटवडा होता.

- वर्ष २०१३-१४ या आर्थिक वर्षात १ लाख ९ हजार २५९ दशलक्ष युनिट इतकी विजेची आवश्यकता असताना १ लाख ४ हजार ७१५ दशलक्ष युनिट इतकीच म्हणजेच २ हजार ५४४ दशलक्ष युनिट विजेची कपात होती.

- राज्यात अजूनही ग्रामीण भागात भारनियमन असून मुंबई नजिकच्या उपनगरांनादेखील भारनियमनाचा फटका सोसावा लागत आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील बहुतेक आदिवासी पाडे असे आहेत जेथे अजूनही वीज पोहोचलेली नाही. राज्यातील २ कोटी ३८ लाख कुटुंबांपैकी ८३.९ टक्के म्हणजेच १ कोटी ९९ लाख कुटंबांपर्यंत वीज पोहोचलेली असून उर्वरित ३९ हजार कुटुंबांपर्यंत अद्यापही वीज पोहोचलेली नाही (जनगणना, २०११)

- दर लाख लोकसंख्येस वीज पुरविण्यास महाराष्ट्र ८ व्या क्रमांकावर व ग्रामीण भागात वीज पुरविण्यात महाराष्ट्र १० व्या क्रमांकावर आहे. असे असताना देखील माननीय राज्यपाल आपल्या अभिभाषणात मात्र सांगतात की, महाराष्ट्र राज्याने १०० टक्के वीज उपलब्ध करुन देण्याची क्षमता निर्माण केली आहे.

**वर्ष २०१२ पर्यंत 'सगळ्यांना विद्युत पुरवठा' हे राष्ट्रीय विद्युत धोरणाचे एक उद्दिष्ट होते. महाराष्ट्र हे विजेचा तुटवडा असलेले राज्य असून विजेची कमाल मागणी भागविण्यात ते अपयशी ठरलेले आहे.**

**- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक**

# राज्याला पुरेशी वीज देण्यास शासन अपयशी !

तक्ता क्र. २ **महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती क्षमता** (दशलक्ष युनिटस्)

| अ.क्र. | स्त्रोताचा प्रकार | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५*+ | २०१३-१४ मध्ये २०१२-१३ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | औष्णिक | ५२,७९६ | ५९४८२ | ६६०७५ | ७१६८६ | ६४४४९ | ८.५ |
| २. | नैसर्गिक वायूजन्य | १८,७२९ | १७२०७ | १०२४२ | ६०५५ | ४०८३ | -४०.९ |
| ३. | जलजन्य | ६,३७४ | ६८५१ | ५९८० | ६७६३ | ४७४९ | १३.१ |
| ४. | अक्षय ऊर्जा $ | ५,११८ | ५९२५ | ५८४२ | ७४८३ | ५२०७ | २८.१ |
| ५. | **एकूण राज्यांतर्गत** | **८३,०१७** | **८९४६५** | **८८१३९** | **९१९८७** | **७८४८८** | **४.४** |
| ६. | **केंद्रीय क्षेत्रातून उपलब्ध** | **२९,९८२** | **३६७५५** | **३४३८२** | **३९९००** | **३२१७०** | **१६.०** |

* डिसेंबर पर्यंत, +अस्थायी , $ बंदिस्त विजेसह स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५

- राज्यातील वर्ष २०११-१२ मधील एकूण वीज निर्मिती (अक्षय ऊर्जेसह) ८९,४६५ दशलक्ष युनिटस् इतकी होती त्यात घट होऊन वर्ष २०१२-१३ मध्ये ८८१३९ दशलक्ष युनिट इतकी झाली होती. आता वर्ष २०१३-१४ मध्ये त्यात वाढ होऊन ९१,९८७ दशलक्ष युनिट इतकी झालेली आहे. मात्र वर्ष २०१४-१५ मधील डिसेंबर पर्यंतची निर्मिती क्षमता पाहिली असता त्यात पुन्हा घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
- वर्ष २००९-१० मध्ये नैसर्गिक वायूजन्य वीज निर्मिती १५,३२२ दशलक्ष युनिटस् होती त्यात वाढ होऊन वर्ष २०१०-११ मध्ये १८,७२९ दशलक्ष युनिटस् एवढी वीज निर्माण करण्यात आली व वर्ष २०११-१२ मध्ये त्यात घट होऊन १७,२०७ दशलक्ष युनिट इतकी कमी झाली होती, वर्ष २०१२-१३ मध्ये तर त्यात अजून घट होऊन ती १०,२४२ दशलक्ष युनिट एवढी झाली. वर्ष २०१३-१४ ची क्षमता पाहिल्यास त्यात फारच ४० टक्के घट होऊन ती ६,०५५ दशलक्ष युनिट इतकी झाली. वर्ष २०१४-१५ च्या डिसेंबर पर्यंतची क्षमता पाहता त्यात अजून घट झाली व ती ४०८३ दशलक्ष युनिट वर आलेली आहे.

**रिन्युअेबल स्त्रोताद्वारे विद्युत खरेदी:-**

रिन्युअेबल स्त्रोतामार्फत कंपनीची वीज खरेदी २००८-१३ मध्ये वाढलेली होती तरी ती महाराष्ट्र विद्युत नियमन आयोगाद्वारे निश्चित करण्यात आलेल्या लक्ष्या पेक्षा ती कमीच होती. सौर उर्जास्त्रोताद्वारे ३५ मेगावॅट प्रतिचौरस किमी सौर विद्युत निर्मिती करणे शक्य असताना राज्य सरकारने सौर ऊर्जा विकासासाठी प्रयत्न केले नव्हते. या स्त्रोताद्वारे महाराष्ट्र शासनाने २०१३ पर्यंत केवळ २० मेगावॅट क्षमतेचा विकास केला होता. म्हणून राज्य शासनाने किंवा कंपनीने सौर ऊर्जा स्त्रोत विकसित करण्यासाठी परिणामकारक पाऊले उचलणे आवश्यक आहे कारण त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियमन आयोगाने विहित केलेल्या कालमर्यादेत या स्त्रोतात असलेली कमतरता भरुन काढणे शक्य होईल व नियमन आकाराचे प्रदान सुद्धा टाळता येईल.

**-भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सार्वजनिक उपक्रम २०१३-१४ चा अहवाल**

## मागील १० वर्षात राज्यात विजेचा तुटवडा सरासरी १३.५३ टक्के!

तक्ता क्र. ३ सरासरी कमाल मागणीच्यावेळी विजेचा पुरवठा व तुट (मेगावॅट मध्ये)

| वर्ष | सरासरी कमाल मागणी + | पुरवठा | तूट | कमाल मागणीशी तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २००५-०६ | १२४०४ | ९२१२ | ३१९२ | २५.७३ |
| २००६-०७ | १२७९७ | ९६३८ | ३१५९ | २४.६८ |
| २००७-०८ | १३१३७ | १०१३० | ३००७ | २२.८८ |
| २००८-०९ | १२५०७ | १०२०३ | २३०४ | १८.४२ |
| २००९-१० | १२६२४ | १०९२१ | १७०३ | १३.४९ |
| २०१०-११ | १३१५७ | ११९१७ | १२४० | ९.४२ |
| २०११-१२ | १४०४३ | १२८४१ | १२०२ | ८.५५ |
| २०१२-१३ | १४०३२ | १३३०९ | ७२३ | ५.१५ |
| २०१३-१४ | १४४०६ | १३८३० | ५७६ | ३.९९ |
| २०१४-१५* | १५९६६ | १५४७३ | ४९३ | ३.०८ |

* डिसेंबर पर्यंत स्त्रोत :- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५

+कृषि भार व्यवस्थापन योजनेद्वारे (सिंगल फेजिंग व फिडर सेपरेशन योजनांसह) कमी झालेला भार (भारमुक्ती/लोड रिलिफ) वगळून.

- वर्ष २००५-०६ ते २०१४-१५ या १० वर्षाच्या काळात विजेचा सरासरी तुटवडा हा १३.५३ टक्के इतका आहे.
- वर्ष २०१३-१४ मध्ये असलेली विजेची १४,४०६ मेगावॅट इतकी सरासरी कमाल मागणी, ५७६ मेगावॅट इतक्या तुटीचे *(महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या भारनियमाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार)* भारनियमन करुन भागविण्यात आली.
- तसेच वर्ष २०१४-१५ मध्ये डिसेंबर पर्यंत १५९६६ मेगावॅट इतकी सरासरी कमाल मागणी ४९३ मेगावॅट विजेच्या भारनियमनासह भागविण्यात आली.

## दरडोई विद्युत निर्मितीमध्ये महाराष्ट्र ७ व्या क्रमांकावर

तक्ता क्र. ४, दरडोई विद्युत निर्मिती, वर्ष २०१२-१३ (किलो वॅट तास)

| क्र. | राज्य | दरडोई विद्युत निर्मिती | क्र. | राज्य | दरडोई विद्युत निर्मिती |
|---|---|---|---|---|---|
| १. | हिमाचल प्रदेश | १४४३.६२ | ४. | पंजाब | ९८३.६० |
| २. | गुजरात | १४१०.०६ | ५. | हरियाणा | ८२९.५१ |
| ३. | छत्तीसगड | १०४८.३५ | ६. | कर्नाटक | ७६७.४२ |
| | | | ७. | महाराष्ट्र | ७६५.८७ |
| | | | | **भारत** | **७९३.२७** |

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५

- वर्ष २०१२-१३ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्य दरडोई विद्युत निर्मिती ७६५.८७ किलो वॅट् तास इतके करत असून देशामध्ये राज्य ७ व्या क्रमांकावर आहे.
- गुजरात मध्ये दरडोई विद्युत निर्मिती १४१०.०६ किलो वॅट तास आहे तर हिमाचल प्रदेश (१४४३.६२ किलो वॅट तास ), छत्तीसगड (१०४८.३५ किलो वॅट तास), पंजाब (९८३.६० किलो वॅट तास) हरियाणा (८२९.५१ किलो वॅट तास) व कर्नाटक (७६७.४२ किलो वॅट तास) ही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत.

# दर लाख लोकसंख्येला वीज पुरविण्यात महाराष्ट्र ५ व्या क्रमांकावर

तक्ता क्र. ५, ३१ मार्च २०१३ पर्यंत, दर लाख लोकसंख्येमागे विजेची स्थापित क्षमता (मेगावॅट)

| क्र. | राज्य | दर लाख लोकसंख्येमागे विजेची स्थापित क्षमता | क्र. | राज्य | दर लाख लोकसंख्येमागे विजेची स्थापित क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| १. | हिमाचल प्रदेश | ३९.४६ | ३. | तामिळनाडू | २२.६८ |
| २. | गुजरात | ३६.९९ | ४. | हरियाणा | २२.५३ |
| | | | ५. | महाराष्ट्र | २१.५० |
| | | | | **भारत** | **१८.३९** |

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५

- ३१ मार्च २०१३ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्राची विजेची स्थापित क्षमता दर लाख लोकसंख्येमागे २१.५० मेगावॅट असून देशात महाराष्ट्राचा ५ वा क्रमांक लागतो.
- गुजरात मध्ये दर लाख लोकसंख्येमागे ३६.९९ मेगावॅट विजेची स्थापित क्षमता आहे तर हिमाचल प्रदेश (३९.४६ मेगावॅट), तामिळनाडू (२२.६८ मेगावॅट), हरियाणा (२२.५३ मेगावॅट), ही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत.

# ग्रामीण भागात वीज पुरविण्यात महाराष्ट्र ११ व्या क्रमांकावर!

तक्ता क्र. ६ (वर्ष २०१२-१३)

| क्र. | राज्य | ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी | क्र. | राज्य | ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | आंध्र प्रदेश | १०० | ६. | पंजाब | १०० |
| २. | दिल्ली | १०० | ७. | तामिळनाडू | १०० |
| ३. | गोवा | १०० | ८. | सिक्किम | १०० |
| ४. | हरियाणा | १०० | ९. | कर्नाटक | ९९.९५ |
| ५. | केरळ | १०० | १०. | हिमाचल प्रदेश | ९९.९१ |
| | | | ११. | महाराष्ट्र | ९९.९१ |
| | | | | **भारत** | **९४.४१** |

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५

- राज्यात ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी वर्ष २००९-१० मध्ये ८८.९० होती ती वर्ष २०१०-११ मध्ये ९९.७७ टक्के व वर्ष २०११-१२ मध्ये ९९.९१ टक्के इतकी वाढली व २०१२-१३ मध्ये इतर राज्यांची टक्केवारी वाढत असताना महराष्ट्राची मात्र टक्केवारी ९९.९१ इतकीच राहिली.
- ग्रामीण विद्युतीकरणामध्ये राज्याची जी वाढ झालेली आहे ती कदाचित पुढे दिलेल्या ग्रामीण विद्युतीकरणाच्या व्याख्येमुळे झालेली दिसते कारण व्याख्येनुसार एका खेड्यातील एकूण कुटुंबांपैकी किमान १० टक्के कुटुंबांना वीज पुरविली की त्या खेड्याला विद्युतीकरण झालेले खेडे म्हणून ओळखले जाते व बहुतेक याच कारणाने महाराष्ट्र वर्ष २००९-१० मध्ये १७ व्या क्रमांकावर होता तो वर्ष २०११-१२ मध्ये ११ व्या क्रमांकावर आलेला असावा.
- महाराष्ट्र राज्य ग्रामीण भागात ९९.९१ टक्के वीज पुरवित असले तरी देशात त्याचा ११ वा क्रमांक लागतो.
- देशाची ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी ९४.४१ टक्के असून देशातील ८ राज्यांची ग्रामीण विद्युतीकरणाची टक्केवारी १०० टक्के आहे.

## ग्रामीण विद्युतीकरणाची व्याख्या:

**व्याख्या सूची :-**

**ग्रामीण विद्युतीकरण (विद्युतीकरण केलेले खेडे)** :- ग्रामपंचायतीने (१) लोकवस्ती असलेले खेडे, तसेच जेथे किमान एक दलित वस्ती/वाडी असेल तेथे वितरण रोहित्र आणि वितरण तारमार्ग यांसारख्या पायाभूत सोयी केलेल्या असतील, आणि (२) शाळा पंचायत कार्यालय, आरोग्य केंद्रे, दवाखाने, समाज मंदिर यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी वीज पुरवलेली असेल, आणि (३) वीज पुरवठा केलेल्या कुटुंबांची संख्या, त्या खेड्यातील कुटुंबांच्या एकूण संख्येपैकी किमान १० टक्के एवढी असेल या मुद्यांवर दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे खेड्यांचे, विद्युतीकरण केलेले खेडे म्हणून वर्गीकरण करण्यात येईल.

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११-१२

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे ढिसाळ नियोजन

**कंपनीची खाजगी वीज खरेदीत वर्षानुवर्ष वाढ:**

राज्यातील विजेची आवश्यकता शास्त्रोक्त पद्धतीने निर्धारित करण्यासाठी तांत्रिक समिती गठित करण्याबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी निर्देश दिले होते. या समितीचे गठण प्रलंबित असल्यामुळे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी सीईएद्वारा प्रकाशित केलेले विद्युत ऊर्जा सर्वेक्षण (ईपीएस) अहवालांच्या आधारावर विजेची आवश्यकता निर्धारित करीत होती व वीज खरेदीचे प्रस्ताव मंजुरीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे पाठवत होती.

कंपनीने २०१२-१३ पर्यंतच्या पाच वर्षांच्या कालावधीत विविध स्त्रोतामार्फत खरेदी केलेल्या विजेचा तपशील खालीलप्रमाणे होता.

तक्ता क्र. ७ (दशलक्ष युनिटसमध्ये)

| तपशील | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|
| **अ) केंद्रीय /राज्य क्षेत्राकडून खरेदी केलेली वीज** | | | | | |
| केंद्रीय क्षेत्र | २७,७३९ | ३२,५८६ | ३६,७१३ | ३७,५८० | ३४,२७३ |
| राज्य क्षेत्र | ४६,३१६ | ४६,६९४ | ४२,४६० | ४३,२१६ | ४३,३८८ |
| **केंद्रीय व राज्य क्षेत्राकडून एकूण खरेदी** | **७४,०५५** | **७९,२८०** | **७९,१७३** | **८०,७९६** | **७७,६६१** |
| एकूण खरेदीशी टक्केवारी | ९२.७२ | ९२.७५ | ८७.५४ | ८१.८९ | ७८.३९ |
| प्रति युनिट किंमत (रु) | २.१३ | २.४१ | २.७८ | ३.०८ | ३.४० |
| **ब) खाजगी क्षेत्राकडून खरेदी केलेली वीज** | | | | | |
| स्वतंत्र वीज उत्पादक (दीर्घ/मध्यम मुदत) | ८१ | ७३ | १,२०८ | ४,६२७ | ७,७८९ |
| लघु मुदत/ घटनास्थळी खरेदी | १,२५७ | ९४२ | २,३७४ | ६,४३९ | ६,३१२ |
| रिन्युएबल वीज | २,९३१ | ३,१८३ | ४,१४७ | ५,६५९ | ७,२८० |
| **खाजगी क्षेत्राकडून एकूण वीज खरेदी** | **४,२६९** | **४,१९८** | **७,७२९** | **१६,७२५** | **२१,३८१** |
| एकूण खरेदीशी टक्केवारी | ५.३४ | ४.९१ | ८.५५ | १६.९५ | २१.५८ |
| प्रति युनिट किंमत (रु) | ४.४७ | ४.८२ | ४.०१ | ४.०७ | ३.८५ |
| क) सूचित न केलेली अदलाबदल खरेदी | १,५४६ | १,९९६ | ३,५३६ | १,१४१ | २६ |
| एकूण खरेदी (अ + ब + क) | ७९,८७० | ८५,४७४ | ९०,४३८ | ९८,६६२ | |

स्रोत: भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा अहवाल (सार्वजनिक उपक्रम) वर्ष २०१४

- वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की केंद्रीय/राज्य क्षेत्रामधील वीज खरेदी वर्ष २००८-०९ मध्ये एकूण वीज खरेदीच्या ९२.७२ टक्क्यावरून २०१२-१३ मध्ये ७८.३९ टक्के पर्यंत कमी झाली होती.
- याउलट स्वतंत्र वीज उत्पादकांकडून खरेदी केलेली वीज २००८-०९ मध्ये ५.३४ टक्क्यावरुन २०१२-१३ मध्ये २१.५८ टक्क्यांपर्यंत वाढली होती.
- वर्ष २००८-०९ मध्ये एकूण वीज खरेदीच्या ३.६७ टक्के म्हणजेच २,९३१ दशलक्ष युनिटस् रिन्युअेबल स्त्रोतामधील वीज खरेदी होती जी वर्ष २०१३-१४ मध्ये ७,२८० दशलक्ष युनिट म्हणजेच ७.३५ टक्क्यांपर्यंत वाढली होती.

## घरगुती ग्राहकांवर वीजभार!

### औद्योगिक, व्यापारी ग्राहकांना मात्र दरकपातीचा दिलासा, महावितरणचा वीज दर प्रस्ताव दाखल

राज्यातील विजेच्या दरात सरासरी ८ टक्के दरवाढ मागणारा ४७१७ कोटी रुपयांचा वीज दरवाढ प्रस्ताव ‘महावितरण’ने दाखल केला आहे. राज्यातील औद्योगिक वीज दर कमी करण्याच्या राज्य सरकारच्या भूमिकेनुसार महावितरणने औद्योगिक ग्राहकांच्या वीज दरात ५टक्के, तर व्यापारी वीज दरात ३ टक्के कपात सुचवण्यात आली आहे. मात्र त्यामुळे महसुलात होणारी तूट भरून काढण्यासाठी दरवाढीचा भार सामान्य घरगुती वीज ग्राहकांवर टाकण्यात आला आहे.

**तक्ता क्र. ८ ‘महावितरण’च्या प्रस्तावानुसार घरगुती ग्राहकांचे वीज बिल**

| दरमहा वीज वापर | सध्याचे वीज बिल | प्रस्तावित वीज बिल | वाढ |
|---|---|---|---|
| १०० युनिट | ४१६ रुपये | ४५०.७५रुपये | ३४.७५रुपये |
| १५०युनिट | ७८५.५०रुपये | १०६५रुपये | २८०रुपये |
| ३००युनिट | १८९४ रुपये | १९६१रुपये | ६७रुपये |
| ५००युनिट | ३८१२ रुपये | ४२३७रुपये | ४२५रुपये |

स्त्रोत : दैनिक लोकसत्ता, दिनांक १८/२/२०१५

# राज्यातील आदिवासी विजेविना अंधारात!

## अनुसूचित जमाती व कल्याण समितीच्या अहवालातील महत्त्वाचे मुद्दे

**अनुसूचित जमाती उपभोक्तांसाठी कृषी वीज पंप जोडणी योजना :**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागातर्फे १०० टक्के अनुदानित (सबसीडी) योजनेंतर्गत असलेल्या अनुसूचित जमातीच्या उपभोक्तांसाठी सेवा जोडणी आकार घेतला जात नाही. तसेच कृषी वीज पंप हे शासनातर्फे अनुदान स्वरुपात देण्यात येत असतात. त्यांना शेतीसाठी वीज पुरवठा देताना प्राधान्य देण्यात येते. मागील तीन वर्षात कृषी वीज पंप जोडण्या दिलेल्या उपभोक्तांची संख्या खालीलप्रमाणे आहे :-

तक्ता क्र. ९

| वर्ष | वीज जोडणीसाठी अनुसूचित जमातीचे प्रलंबित अर्ज संख्या | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना एकूण दिलेली वीज जोडणी | अनुसूचित जमातीच्या अर्जदारांची वर्षअखेर प्रलंबित वीज जोडणी |
|---|---|---|---|
| २००६-०७ | १०५९ | २६८ | ७९१ |
| २००७-०८ | ७९१ | १०० | ६९१ |
| २००८-०९ | ६९१ | २२९ | ४६२ |
| **एकूण** | | **५९७** | |

स्रोत: अनुसूचित जमाती कल्याण समिती अहवाल क्र. ४ (वर्ष २०१०-११)

समितीने अनुसूचित जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी जिल्ह्यातील आदिवासी पाडे, वस्त्या वगैरे या ठिकाणी कोणत्या योजना राबविल्या आहेत अशी पृच्छा केली असता अधिक्षक अभियंता यांनी यवतमाळ जिल्ह्यात १८६९ गावे आहेत. त्यातील ५६७ गावे ही आदिवासी उपयोजनेत समाविष्ट करण्यात आलेली आहेत त्यापैकी ५९४ गावांचे विद्युतीकरण करण्यात आलेले असून **६३ गावांचे विद्युतीकरण व्हावयाचे आहे. म्हणजेच गावातील १० टक्के घरांमध्ये वीज गेलेली असेल तर त्या गावाचे विद्युतीकरण झालेले आहे असे मानले जाते अशी समितीला माहिती दिली.**

गावांचे विद्युतीकरण करण्यात आलेले आहे म्हणजे आपण नेमके काय केले आहे, गावापर्यंत वीज दिलेली आहे की, गावातील आदिवासींच्या घरामध्ये प्रत्यक्ष वीज दिलेली आहे अशी समितीने विचारणा केली असता मुख्य अभियंता यांनी जिल्ह्यात एकूण **२३७ आदिवासी पाडे असून त्यापैकी ३० पाड्यांचे विद्युतीकरण व्हायचे आहे**. विद्युतीकरण बाकी असलेल्या गावांचा आणि पाड्यांचा समावेश राजीव गांधी विद्युतीकरण योजनेंतर्गत करण्यात आला आहे. **राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतून यवतमाळ जिल्ह्यासाठी २५.१७ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत आणि त्यातून एकूण २६२ गावांचे विद्युतीकरण करण्याचे काम प्रस्तावित केलेले आहे**, असे समितीला सांगितले. समितीने ज्या ज्या ठिकाणी वीज कनेक्शनची सोय अजून झालेली नाही आणि ज्यांना वीज द्यायची आहे त्या त्या ठिकाणी पत्रके काढून ग्रामसेवकांमार्फत आदिवासींची नावे घेण्यात यावी जेणे करुन ही योजना चांगल्याप्रकारे राबविली जाईल अशी शिफारस केली.

## ग्रामीण विद्युतीकरणाबाबत अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या शिफारशी-

- आदिवासी गावातील शेतकऱ्यांना पाण्याची सोय व्हावी या हेतूने शेती पंपाला वीज देताना आदिवासी जमातीच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. वीज पुरवठा करतांना ४ विद्युत पोल देण्याचे जे निकष आहेत त्यात शिथिलता आणणे गरजेचे आहे. अशा निकषांमुळे आदिवासींना वीज कनेक्शन मिळण्यास अडचण होते. शेती पंपासाठी विद्युत पुरवठा करण्यात येत असून सन २००५-०६ ते सन २००९-१० या कालावधीत **एकूण ८७७ लाभार्थ्यांना शेती विद्युत पुरवठा करण्यात आला असल्याचे आकडेवारीवरुन दिसून येते परंतु आजपर्यंत ६२३ पात्र आदिवासी लाभार्थ्यांना शेतीसाठी वीज पुरवठा करण्यात आला आहे असे निदर्शनास आलेले असल्याने** उर्वरित २५१ आदिवासी लाभार्थ्यांना शेतीसाठी वीज पुरवठा करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.
- समितीने महावितरण कंपनीला भेट दिल्यानंतर, आदिवासींना वीज कनेक्शन आणि मोटार पंपासाठी १००% अनुदानाची योजना प्रभावीपणे कार्यान्वित होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने विद्युत महावितरण कंपनीकडे निधी वर्ग केल्यास महावितरण कंपनीकडून तातडीने मोटारपंप खरेदी करण्यात येतील. विजेचे कनेक्शन्स आणि मोटार पंप महावितरण कंपनीकडून बसवून घेतल्यास आदिवासी शेतकऱ्यांना त्याचा लाभ त्वरित मिळू शकेल. आदिवासी शेतकऱ्यांना विद्युत पंप देण्याची ही एक चांगली योजना असल्याने महावितरण कंपनीला विद्युत पंप बसविण्याचे काम दिले तर ही योजना अतिशय चांगल्याप्रकारे अमंलात येऊ शकेल.

  यवतमाळ जिल्ह्यात ६५७ गावांमध्ये ३८७ प्रकरणे या योजनेमुळे प्रलंबित आहेत. प्रकल्प अधिकारी पांढरकवडा क्षेत्राअंतर्गत सन १९९१ च्या जनगणनेनुसार ८७ हजार आदिवासींची लोकसंख्या होती व सन २००१च्या जनगणनेनुसार ४ लक्ष ७३ हजार एवढी आदिवासींची लोकसंख्या आहे. **या प्रकल्पांतर्गत सन २००२ पासून मोटार पंप वीज कनेक्शन अभावी बंद पडून आहेत.** आदिवासी विकास विभागाने आदिवासींना मोटार पंप दिले परंतु विद्युत वितरण कंपनीने विहित मुदतीत वीज कनेक्शन दिलेले नसल्याने विजेची मागणी वाढली. वीज कनेक्शनचे टारगेट वाढवून ज्या लाभार्थ्यांना मोटार पंप दिले आहे अशा लाभार्थ्यांचे वीज कनेक्शन जोडणीचे काम पूर्ण करण्याच्या सूचना विद्युत वितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.
- त्र्यंबक तालुक्यातील (जि.नाशिक)हरसुल या गावाअंतर्गत ७२ खेड्यांमध्ये महावितरण कंपनीच्या अभियंता यांना त्या ठिकाणी जाणे शक्य होत नसल्याने तेथील आदिवासी लोकांना अद्यापपर्यंत (२०१०-११) वीज पुरवठा देण्यात आलेला नाही त्यामुळे आदिवासी लोकांचा विकास होऊ शकत नाही.
- नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा, धडगाव या भागात परिस्थिती अतिशय गंभीर आहे. आदिवासी विकास विभागाच्या फंडातून सब स्टेशन बांधली आहेत. परंतु, १८० ॲम्पिअर वीज कॅपॅसिटी असताना त्याचा योग्य वापर केला जात नाही, आदिवासीना इलेक्ट्रिक कनेक्शन देण्यात आलेले नाहीत. सदर ठिकाणी सब स्टेशन्स बांधली आहेत. आदिवासींना वीज कनेक्शन देणे अत्यंत आवश्यक आहे. आदिवासींना वीज कनेक्शन दिले तर फार मोठ्या प्रमाणात आदिवासीचे प्रश्न सुटू शकतील.

स्रोत: अनुसूचित जमाती कल्याण समिती अहवाल क्र. ४ व ६ (वर्ष २०१०-११)

## ग्रामीण विद्युतीकरणाबाबत लोकलेखा समितीच्या शिफारशी:

- ◈ शासनाने सन १९७३ मध्ये आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप संच पुरविण्याची योजना सुरू केली. हे वीज पंप संच बसविण्याची व त्यासाठी वीज पुरवठा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे पुरविण्याची जबाबदारी आदिवासी विकास महामंडळावर सोपविण्यात आली होती. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी यांनी याबाबतचे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्याची खात्री करून घ्यावयाची होती. समितीपुढे आलेल्या माहितीवरून असे दिसून आले की, **सन १९९९-२००० व २००२-०३ दरम्यान १६,८१५ वीज पंप संचाचे वाटप केले. त्यापैकी ११,८६७ वीज पंप संच मे, २००६ पर्यंत कार्यान्वित झाले नव्हते. ७५८८ प्रकरणी वीज मंडळाने मागणीपत्रास मंजुरी दिली नव्हती व ३९१२ प्रकरणी वीज मंडळाने पूर्ण सोपस्कार होऊनही वीज पुरविली नव्हती. तर ३६७ पंप संच आदिवासी महामंडळाकडे पडून होते.**
- ◈ आदिवासी हा घटक समाजातील कमकुवत घटकांपैकी आहे. आदिवासी क्षेत्राचा तसेच या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. आदिवासी विकासाच्या विविध योजना राज्य व केंद्र शासनाकडून राबविण्यात येतात. या योजनांपैकी आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप/ तेल पंप पुरविणे ही एक योजना होय. सन १९७३-७४ पासून ही योजना शासनाकडून राबविण्यात येत असून **३ दशके उलटून गेली तरी अद्यापपर्यंत सर्व आदिवासी शेतकऱ्यांना वीज पंप पुरविण्यात शासनास यश आलेले नाही.** समितीसमोर आलेल्या माहितीमध्ये सन १९९९ ते २०११ पर्यंत एकूण १० ते ११ वर्षांपासून आदिवासी व शेतकऱ्यांच्या विजेच्या जोडण्यांना प्राधान्य आणि डी.पी. डी.सी. अंतर्गत सवलतीची तरतूद असताना **आदिवासी शेतकऱ्यांनी शेतीपंप विकत घेतल्यानंतरही चार ते पाच वर्षे विद्युत जोडण्या दिल्या जात नाहीत. ही अतिशय खेदजनक बाब आहे** अशाप्रकारे आदिवासींना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवून त्यांचा विकास खुंटत आहे. याबाबत समितीने तीव्र शब्दात नापसंती व्यक्त केली. **तरी आदिवासी शेतकऱ्यांच्या वीज पंपाच्या विद्युत जोडणीची सर्व कामे तात्काळ पूर्ण करण्यात यावीत व त्याबाबतचा सविस्तर अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**
- ◈ **महावितरणाचे कार्यकारी अभियंता ते वायरमन पर्यंत कोणतेही अधिकारी व कर्मचारी तालुका किंवा ग्रामपातळीवर त्यांच्या कामाच्या ठिकाणी उपस्थित किंवा सेवेस हजर नसतात. त्यांची नेमणूक ग्रामीण पातळीवर असतानाही त्यांचा मुक्काम शहरी भागातच असतो.** मीटर बंद असणे, विजेच्या तारा तुटलेल्या असणे या सर्व समस्यांकडे व त्या निवारण्याचा दृष्टिकोनातून गांभिर्याने लक्ष घालत नाहीत. नागरिक व शेतकरी यांच्या तक्रारीकडे स्थानिक अधिकारी लक्ष देत नसल्याच्या अनेक तक्रारी महावितरणाकडे येत असतात. ज्या ठिकाणी नागरिकांच्या अनेक तक्रारी व समस्या आहे त्या तातडीने दूर करण्यासाठी विशेष लक्ष देऊन त्यांचे योग्य निवारण करण्याकरिता आवश्यक त्या सूचना सर्व संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना देण्यात याव्यात. तसेच अशा ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक भेटी देऊन त्यांचे कर्मचारी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी कार्यरत असून त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींची दखल घेतात किंवा नाही याबाबत नियमित माहिती घ्यावी. अशा **अचानक दिलेल्या भेटीमध्ये संबंधित क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी आढळून न आल्यास तसेच त्यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या तक्रार नोंदवहीत तक्रारी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

*(स्रोत: लोकलेखा समिती वर्ष २०१०-११ अहवाल क्र. आठ)*

# उद्योग

राज्याने रोजगार निर्मितीची सर्वाधिक क्षमता असलेले सर्वात जास्त प्रस्ताव प्राप्त केले आहेत. ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीत एकूण रु. १०,६३,३४२ कोटी गुंतवणुकीच्या १८, ७०९ औद्योगिक प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. यापैकी रु. २,५४,७८४ कोटी गुंतवणुकीचे (२३.९ टक्के) व प्रस्तावित १०.९५ लाख रोजगार निर्मितीचे ८,३७६ प्रकल्प (४४.८टक्के) कार्यान्वित झाले आहेत. तर रु. ८८,०८६ कोटी गुंतवणुकीच्या २,११५ प्रकल्पांचे काम सुरू असून त्यामधून ३.०३ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. देशामध्ये प्राप्त झालेल्या एकूण औद्योगिक प्रस्ताव आणि गुंतवणुकीमध्ये राज्याचा अनुक्रमे १८ टक्के आणि १० टक्के वाटा आहे. निवडक राज्यातील मंजूर औद्योगिक प्रस्ताव व गुंतवणूकीबाबतची माहिती खाली दिली आहे.

## औद्योगिक गुंतवणुकीत महाराष्ट्र गुजरातच्या मागे!

तक्ता क्र- १० निवडक राज्यातील मंजूर औद्योगिक प्रस्ताव (ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०१४)

| राज्य | औद्योगिक प्रस्ताव (संख्या) | गुंतवणूक (रु. कोटीत) | गुंतवणुकीची भारताशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १८७०९ | १०६३३४२ | ९.८६ |
| गुजरात | १२५८४ | १३१८०५० | १२.२३ |
| तामिळनाडू | ९३०७ | ५११९८३ | ४.७५ |
| आंध्र प्रदेश | ८५०६ | ९३९७६६ | ८.७२ |
| उत्तर प्रदेश | ८००५ | ३१५१७२ | २.९२ |
| **भारत** | **१०४०३४** | **१०७८०४४९** | **१००** |

*(स्रोत:- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१४-१५ )*

- राज्यात ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीत रु. १० लाख ६३ हजार ३४२ कोटींची गुंतवणूक झालेली दिसत असली तरी आपल्या शेजारचे राज्य गुजरात येथे याच कालावधीत आपल्या राज्याहून अधिक रु. १३ लाख १८ हजार ०५० कोटींची गुंतवणूक झालेली दिसते.
- महाराष्ट्र राज्यात एकूण १८ हजार ७०९ औद्योगिक प्रस्ताव आले तर गुजरातमध्ये महाराष्ट्रापेक्षा कमी १२ हजार ५८४ इतके औद्योगिक प्रस्ताव आले मात्र गुंतवणूक जास्त झाल्याची दिसते.
- महाराष्ट्राची गुजरातशी तुलना करता, राज्याच्या एकूण प्रस्तावापैकी गुजरातमध्ये ६ हजार १२५ प्रस्ताव कमी आलेले असून देखील त्यांची गुंतवणूक ही २ लाख ५४ हजार ७०८ कोटींनी जास्त दिसते.
- औद्योगिक प्रस्तावामध्ये प्रथम क्रमांकावर असलेला महाराष्ट्र गुंतवणुकीमध्ये मात्र मागील ४ वर्ष सतत दुसऱ्या क्रमांकावर आहे.

# विशेष आर्थिक क्षेत्र

## राज्यातील एकूण १२४ विशेष आर्थिक क्षेत्रांना केंद्राची मान्यता

## कोकणात सर्वाधिक ६१ विशेष आर्थिक क्षेत्र मंजूर

केंद्र शासनाच्या विशेष आर्थिक क्षेत्र कायदा, २००५ व विशेष आर्थिक क्षेत्र नियम,२००६ नुसार महाराष्ट्रातील विशेष आर्थिक क्षेत्राबाबतचे कामकाज केले जाते. राज्यातील विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यासाठी डिसेंबर २०१४ पर्यंत एकूण २३६ विशेष आर्थिक क्षेत्राबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या प्राप्त प्रस्तावांपैकी १२४ प्रस्तावांना केंद्र शासनाकडून मान्यता (१०४ औपचारिकरित्या व २० तत्त्वत:) देण्यात आली आणि ६६ प्रस्ताव अधिसूचित झाले आहेत.

तक्ता क्र. ११– मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रांमधील प्रस्तावित गुंतवणूक व रोजगार ( डिसेंबर, २०१४ पर्यंत)

| विभाग | विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या | | | क्षेत्र (हेक्टर) | | | रोजगार (लाखात) | | | गुंतवणूक (रु. कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित |
| कोकण | ६१ | २९ | ५ | १६४४६ | २४५३ | २६१ | ३५.८७ | ९.८४ | ०.४६ | ८३५०३ | ३३५३६ | ४४८७ |
| पुणे | ३६ | २१ | १४ | ४२५२ | १७८४ | ७२४ | १०.६३ | ६.१७ | ०.८३ | ४२०९५ | ३४९८० | ९६८२ |
| नाशिक | ६ | १ | ० | १२४९ | १००७ | ० | २.१२ | १.२५ | ० | २८८३ | १३८० | ० |
| औरंगाबाद | ११ | ७ | ३ | ३४४८ | ७८५ | ३७५ | १.३७ | ०.३१ | ०.०१ | ३६५५ | १७७५ | ८३० |
| अमरावती | ३ | ३ | ० | १३१६ | १३१६ | ० | ०.४० | ०.४० | ० | २७७६ | २७७६ | ० |
| नागपूर | ७ | ५ | २ | २९९७ | १८८७ | १६९९ | ५.४६ | ३.९२ | ०.०१ | ८८१९ | ४१७२ | ३७८७ |
| **एकूण** | **१२४** | **६६** | **२४** | **२९७०८** | **९२३२** | **३०५९** | **५५.८५** | **२१.८९** | **१.३१** | **१४३७३१** | **७८६१९** | **१८७८६** |

*(स्रोत:- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१४-१५ )*

- राज्यातील एकूण १२४ विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्ताव केंद्र शासनाने मान्य केलेले असून ६६ प्रस्ताव अधिसूचित झालेले आहेत व त्यापैकी केवळ २४ प्रस्ताव कार्यान्वित आहेत.
- मंजूर प्रस्तावांमध्ये एकूण रु. १ लाख ४३ हजार ७३१ कोटींच्या प्रस्तावित गुंतवणुकीपैकी केवळ कोकणातच रु. ८३ हजार ५०३ कोटी (५८ टक्के) गुंतवणूक तर १६ हजार ४४६ हेक्टर जमीन विशेष आर्थिक क्षेत्राखाली जाणार.
- एकूण प्रस्तावित गुंतवणुकीपैकी अमरावतीमध्ये सर्वात कमी रु. २ हजार ७७६ कोटी (१.९३ टक्के) गुंतवणूक तर नाशिक मध्ये रु. २ हजार ८८३ कोटी (२ टक्के) गुंतवणूक अपेक्षित आहे मात्र अजूनही नाशिक व अमरावतीमध्ये मध्ये एकही प्रकल्प कार्यान्वित झालेला नाही.
- मंजूर प्रस्तावानुसार एकूण प्रस्तावित गुंतवणूक रु. १ लाख ४३ हजार ७३१ कोटी असून त्यातून प्रस्तावित रोजगार ५५.८५ लाख इतका आहे.
- कोकणानंतर पुण्यामध्ये एकूण ३६ विशेष आर्थिक क्षेत्राचे प्रस्ताव मंजूर केलेले असून त्यातील २१ अधिसूचित करण्यात आलेले आहेत व १४ कार्यान्वित झालेले आहेत. मंजूर प्रस्तावातून रु. ४२ हजार ०९५ कोटींची गुंतवणूक प्रस्तावित आहे.
- राज्यात एकूण २४ प्रस्ताव कार्यान्वित झालेले असून त्यामध्ये ३ हजार ५९ हेक्टर क्षेत्र गेले आहे तर १.३१ लाख रोजगार निर्मिती झालेली आहे व त्यासाठी रु. १८ हजार ७८६ कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे.

# पुनर्निर्माण वस्तू उद्योगात सर्वाधिक ३५.५६टक्के रोजगार

तक्ता क्र. १२ महाराष्ट्र राज्यातील प्रमुख उद्योग गटानुसार कारखान्यातील रोजगार

| उद्योग गट | सरासरी दैनिक रोजगार (संख्या शंभरात) | | | एकूणाशी टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१० | २०११ | २०१२ | २०१० | २०११ | २०१२ |
| **ग्राहक वस्तू उद्योग:** | **४,८९४** | **५,१६४** | **५९३९** | **२९.७०** | **२८.४६** | **२८.८८** |
| खाद्य उत्पादने,पेये व तंबाखूची उत्पादने | १,९२६ | १,९९१ | २३४८ | ३९.३५ | ३८.५६ | ३९.५४ |
| वस्त्रोद्योग (परिधान करण्याची वस्त्रे धरुन) | २,०४५ | २,१८२ | २५०९ | ४१.७९ | ४२.२५ | ४२.२५ |
| लाकूड आणि लाकडाची उत्पादने | १९७ | २१७ | २१६ | ४.०३ | ४.२० | ३.६४ |
| कागद आणि कागदाची उत्पादने, मुद्रण, प्रकाशन इ. | ६९३ | ७३६ | ८१६ | १४.१६ | १४.२५ | १३.७४ |
| कातडी कमावणे व चामड्याची उत्पादने | ३३ | ३८ | ५० | ०.६७ | ०.७४ | ०.८४ |
| **पुनर्निर्माण वस्तू उद्योग:** | **५,९७७** | **६,६४८** | **७३१३** | **३६.२७** | **३६.६४** | **३५.५६** |
| रसायने व रासायनिक उत्पादने | १,६६३ | १,८०२ | २०१४ | २७.८३ | २७.११ | २७.५४ |
| पेट्रोलियम, रबर, प्लास्टिक उत्पादने | ९४९ | १,०८७ | ११४४ | १५.८८ | १६.३५ | १५.६४ |
| अधातू खनिज उत्पादने | ४११ | ४६५ | ५३८ | ६.८८ | ६.९९ | ७.३६ |
| मूलभूत धातू व धातू उत्पादने | २,९५४ | ३,२९४ | ३६१७ | ४९.४३ | ४९.५५ | ४९.४६ |
| **भांडवली व वस्तू उद्योग:** | **४,२८८** | **५,०३३** | **५८२७** | **२६.०२** | **२७.७४** | **२८.३४** |
| यंत्रे व यंत्रसामुग्री (परिवहन सामग्री वगळून) | २,०९६ | २,४०७ | २६६७ | ४८.८८ | ४७.८२ | ४५.७७ |
| परिवहन सामग्री | १,४९२ | १,७८५ | २१३९ | ३४.७९ | ३५.४७ | ३६.७१ |
| इतर वस्तूनिर्माण उद्योग | ७०० | ८४१ | १०२१ | १६.३२ | १६.७१ | १७.५२ |
| **इतर** | **१,३२०** | **१,३०१** | **१४८५** | **८.०१** | **७.१७** | **२५.४८** |
| **एकूण** | **१६,४७८** | **१८,१४६** | **२०५६४** | **१००** | **१००** | **१००.००** |

*(स्त्रोत:- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१४-१५)*

- वर्ष २०१२ च्या आकडेवारीनुसार राज्यातील सरासरी दैनिक रोजगारामध्ये ग्राहक वस्तू उद्योगाचा वाटा २८.८८ टक्के, पुनर्निर्माण वस्तू उद्योगाचा वाटा ३५.५६ टक्के तर भांडवली वस्तू उद्योगाचा वाटा हा २८.३४ टक्के इतका होता.
- राज्यात प्रमुख उद्योगगटांमध्ये पुनर्निर्माण वस्तू उद्योगात वर्ष २०१२ मध्ये सर्वात अधिक ३५.५६ टक्के रोजगार.
- वर्ष २०१० शी तुलना करता पुनर्निर्माण वस्तू उद्योगातील रोजगाराच्या प्रमाणात वर्ष २०११ मध्ये ११.२२ टक्के तर वर्ष २०१२ मध्ये २२.८३ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते.

## साखर उद्योग संकटात : राज्यात १५० लाख टन ऊस गाळपाविना शिल्लक

देशातील एकूण साखर कारखान्यांपैकी ३१ टक्के कारखाने राज्यात असून त्या खालोखाल २३ टक्के कारखाने उत्तर प्रदेशात आहेत. मार्च, २०१४ अखेर देशातील एकूण गाळप झालेल्या साखरेच्या उत्पादनात राज्याचा हिस्सा ३२ टक्के होता.

आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे दर मोठ्या प्रमाणावर घसरल्याने राज्यातील साखर-ऊस उद्योग कधी नव्हे इतक्या संकटात सापडला आहे. तब्बल १५० लाख टन ऊस गाळपाविना शिल्लक राहाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यातच साखरेचा उत्पादन खर्च सरासरी ३२०० ते ३६०० रुपयांवर गेला असताना बाजारात २२१५ रुपये प्रतिक्विंटलचा भाव स्थिर झाल्याने हा उद्योग आर्थिक अडचणीत आला आहे.

एकीकडे उसाचे उत्पादन वाढले असताना दुसरीकडे वीस खासगी साखर कारखाने बंद करण्यात आले असून ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. आधीच आर्थिक डबघाईला आलेले सहकारी कारखाने आणखी गाळात जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे. उत्पादन खर्च आणि साखरेला मिळणारा भाव यातील तफावतीमुळे केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या 'एफआरपी'नुसार दर देणेही कारखान्यांसाठी कठीण झाले आहे. दरम्यान, व्यापाऱ्यांच्या तालावर नाचणाऱ्या सरकारला या समस्येचे थोडेही गांभीर्य नाही.

स्त्रोत : दैनिक सकाळ, दिनांक २३/३/२०१५

.